**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/२०२०/CR.९२/DisM-१/दि.१३/०४/२०२०.

जिल्हा दंडाधिकारी पालघर * जिल्हा पालघर *

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.२१/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक :-१४/०४/२०२०

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. त्या करीता पालघर जिल्हयातील कार्यक्षेत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश पारित करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी, करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.४ च्या अधिसुचनेव्दारे राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती दि.३०/०४/२०२० पर्यंत लागू करण्यात आली आहे. तसेच मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी दि.०३/०५/२०२० पर्यंत लॉकडाऊन लागू राहील असे जाहिर केले आहे.

आणि ज्या अर्थी परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जिविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होऊ शकते. तसेच पालघर जिल्हयातील वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये आढळून येणाऱ्या कोव्हीड-१९ च्या रुग्णांची संख्या विचारात घेता, तातडीची प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या वाहतुकीस मनाई करण्यासाठी स्थानिक, निवासी, अभ्यागत, वारंवार कामानिमित्त **पालघर जिल्हयाच्या हद्दीत प्रवेश करण्यास मनाई आदेश लागू करणे आवश्यक आहे.**

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामध्ये** आलेल्या कोणत्याही व्यक्तींना (Home Quarantine केलेल्या व्यक्तींसह) कोणत्याही सार्वजनिक/ खाजगी ठिकाणी, परिसरातील रस्ते, हमरस्ते, सार्वजनिक मार्ग या ठिकाणी प्रवेश करणे, फिरणे, उभे राहणे, ताटकळणे, भटकणे तसेच कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतूकीने रस्त्यावर, गल्लोगल्ली या ठिकाणी सायकल तसेच पारंपारीक व

अपारंपारीक इंधनावर चालणाऱ्या मोटरसायकल (गिअरसह/ शिवाय), सर्व प्रकारची तीन चाकी वाहने, हलकीवाहने, मध्यम वजनाची वाहने, खाजगी प्रवासी वाहने तसेच सर्व प्रकारच्या रिक्षा, टॅक्सी (अॅप आधारीत ओला, उबेर व तत्सम वाहनांस) यांचा प्रवास व वाहतूक यासाठी वापर करण्यास (रुग्णांची वाहतुक सोडून) मनाई करणारा आदेश **दिनांक १४/०४/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक ०३/०५/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंतचे दरम्यान लागू करीत आहे.**

तथापी, जिल्हयातील अत्यावश्यक व जीवनावश्यक सेवा पुरविणाऱ्या खालील आस्थापनांना यातून वगळण्यात आले आहे. सदर आदेश खालील बाबतीत लागू होणार नाही.

१. दुध, अन्न पुरवठा सेवा, अन्नधान्य, किराणा, चिकन, मटण, अंडी, मासे.
२. फळे व भाजीपाला.
३. पशु व पोल्ट्री खाद्य, मत्स्य खाद्य व कोलंबी खाद्य व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)
४. हॉस्पीटल, मेडीसीन व फार्मास्युटीकल्स संबंधित सेवा, वैद्यकीय साहित्य (Medical Equipment)
५. बँकींग व वित्तीय सेवा, विमान सेवा संबंधित सेवा.
६. दुरध्वनी व संचार सेवा.
७. बंदर संबंधित सेवा.
८. प्रसार माध्यमे संबंधित.
९. विज, पेट्रोलियम, ऑईल आणि एनर्जी संबंधित.
१०. पिण्याचे पाणी व पाणी पुरवठा.
११. कृषी निविष्ठा विक्री केंद्रे व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)
१२. वरील सर्व बाबींशी संबंधित वेअर हाऊसिंग, कोल्ड स्टोरेजे (शितगृह) वरील सर्व बाबींशी संबंधित पुरवठा साखळी (Supply Chain)
१३. वरील सर्व सेवांशी संबंधित IT Services (मर्यादित मनुष्यबळावर)
१४. वस्तू/माल व त्या संबंधित मनुष्यबळाची वाहतूक करणारी वाहने (आवश्यक फलक लावून)
१५. पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित वाहने (फक्त कर्तव्यार्थ)
१६. अग्निशमन सेवा, कायदा व सुव्यवस्था तसेच अत्यावश्यक सेवा व तातडीने रुग्णवाहतूक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफ (फक्त कर्तव्यार्थ)
१७. माझ्यावतीने व पोलीस अधीक्षक पालघर यांनी परवानगी /पासेस दिलेल्या व्यक्ती व वाहने.
१८. खाजगी सुरक्षा सेवा.
१९. टेलिकम्युनिकेशन, इंटरनेट सर्व्हिसेस, ब्रॉड कास्टींग आणि केबल सर्व्हिसेस.
२०. अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या आस्थापना.
२१. Production units, which require continuous process after obtaining required permission from the state government.
२२. पशु वैद्यकीय दवाखाने व संबंधित आस्थापना.

(टिप :- वर नमुद प्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीबाबतचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे रुग्णांनी सोबत बाळगणे आवश्यक असेल.)

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधिताना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानूसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात